# गडचिरोली जिल्हा

# पोलीस शिपाई भरती – 2021

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम 2011 व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या आणि दिनांक 23.06.2022 च्या सेवाप्रवेश नियमात केलेल्या सुधारीत तरतुदीनुसार पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई यांची 348 रिक्त असलेले पदे भरण्यासाठी आवेदन पत्र संगणकिय प्रणालीद्वारे दिनांक 09.11.2022 ते 30.11.2022 या कालावधीत स्विकारण्यात येतील या बाबतीचे सविस्तर माहीती policerecruitment2022.mahait.org आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात आली आहे.

- उमेदवारांस पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई या पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा policerecruitment2022.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.
- उमेदवारांस एकाच घटकातील एका पदांसाठी एकापेक्षा जास्त आवेदन अर्ज सादर करू शकत नाही.
- उमेदवाराने चुकीचे माहिती दिल्यास उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्य होईल.
- पोलीस शिपाई या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवाराची प्रथम 50 गुणांची शारिरिक चाचणी परीक्षा घेण्यात येईल व त्यानतंर होणारी लेखी परीक्षा ही पोलीस आयुक्त बृहमुंबई यांचे आस्थापनेवरील भरती प्रकिया वगळता इतर सर्व पोलीस घटकामध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी आयोजीत करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाबत विचारात घेवुनच आवेदन अर्ज भरावा.
- भरती प्रकिये मध्ये प्रथम शारिरिक चाचणी घेण्यात येणार आहे. शारिरिक योग्यता चाचणीमध्ये किमान 50 टक्के गुण मिळविणारे उमेदवारांमधुन संबधीत प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदांच्या 1:10 प्रमाणात उमेदवारांची 100 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान 40 टक्के गुण मिळविणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये 40 टक्केपेक्षा कमी गुण असलेले उमेदवारांस अपात्र समजण्यात येतील.
- शारिरिक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये नमुद केलेल्या दोन निकषांच्या निकालाच्या आधारे उमेदवारामधुन एक गुणवत्ता यादी तयार केली जाईल. तात्पुरत्या निवड सुची मध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मुळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येईल. कागदपत्र पडताळणीतील पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या निवडसुची मध्ये समावेश केला जाईल. निवडसुची तील उमेदवाराची निवड तात्पुरती (PROVISIONAL SELECTION) असेल शारिरिक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणाच्या एकत्रिकरण केल्यानतंर, गृह विभाग शासन निर्णय दिनांक 10.12.2020 नुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.
- पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक अर्हता, शारिरिक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे/ कागदपत्रे सामाजीक व समांतर आरक्षणाबाबतची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सुचना policerecruitment2022.mahait.org या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहीरातीमध्ये उपलब्ध आहेत. सदरहु जाहिरात उमेदवांरानी काळजीपुर्वक वाचुन समजुन घ्यावी. तसेच सामाजिक

समातंर आरक्षण व अनाथकरीता उपलब्ध पदांच्या 1 टक्के आरक्षित जागा विचारात घेवुन रिक्त पदांबाबतची खातरजमा करावी व त्यानतंर उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.

- भरती प्रकिये दरम्यान शारिरिक चाचणी व लेखी चाचणी मध्ये निश्चीत केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहील्यास, त्यास भरती प्रकियेतुन बाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्चीत केलेल्या दिनांकामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करता येणार नाही.
- उमेदवारांनी संकेतस्थळावर जावुन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे, त्या घटकात रिक्त पदे विचारात घेवुनच उमेदवारांन अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात (Unreserved) अर्ज करू शकतात परंतु खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करू शकणार नाहीत.
- पदोन्नती वरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचीका क्रमांक 28306/2017 बाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधीन राहुण व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचीका क्रमांक 175/2018 व इतर संलग्न याचीकांमध्ये दिनांक 27.06.2019 रोजी दिलेल्या निर्णयाविरूध्द मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचीके बाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहुन रिक्त पदांची गणणा केलेली आहे. त्यामुळे जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदाच्या संख्येमध्ये बदल होउ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.
- शासनाने लागु केलेले खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी लागु केलेले आरक्षण हे याअनुषंगाने उदभवणा-या न्यायालयीन प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन असेल.
- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, आदेश दिनांक 23 मार्च, 2018 अन्वये उमेदवाराला अतिरिक्त 100 गुणांची गोंडी माडीया भाषेची लेखी चाचणी परीक्षा दयावी लागेल. सदर लेखी परीक्षेमध्ये 35 टक्के गुण मिळवुन उर्त्तीण होणे आवश्यक असुन सदरचे गुण अंतिम गुणवत्ता यादी तयार करताना विचारात घेतले जाणार नाही.
- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, आदेश दिनांक 23 मार्च, 2018 अन्वये गडचिरोली जिल्हयामध्ये राहणा-या उमेदवारांनाच गडचिरोली जिल्हा पोलीस भरती मध्ये भाग घेता येईल. सदर उमेदवारांना प्रचलित नियमानुसार संबधीत तहसिलदार यांनी दिलेला वास्तव्याचा दाखला (Residential Certificate) जोडणे आवश्यक राहील.
- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, आदेश दिनांक 23 मार्च, 2018 अन्वये असे उमेदवार गडचिरोली जिल्हयाच्या बाहेर बदलीपात्र असणार नाहीत.

( नीलोत्पल, भापोसे )
पोलीस अधीक्षक,गडचिरोली

# महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन 2021
## पोलीस अधिक्षक, गडचिरोली

जाहिरात क्रमांकः पोअग/आस्था/प्र.लि./पो.भ.2021/2022 गडचिरोली, दिनांक 07.11.2022

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम 2011 व त्यानतंर शासनाने वेळोवेळी आणि दिनांक 23.06.2022 च्या आदेशान्वये केलेल्या सुधारणानुसार पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांच्या आस्थापनेवर सन 2021 मध्ये पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी 348 पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

1) पोलीस शिपाई

| | अजा | अज | विज–अ | भज–ब | भज–क | भज–ड | विमाप्र | इमाव | इडब्लु एस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | 5 | 110 | 17 | 9 | 17 | 0 | 0 | 190 | 0 | 0 | 348 |
| कप्पीकृत आरक्षण↓ | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 2 | 31 | 4 | 5 | 4 | 0 | 0 | 54 | 0 | 0 | 100 |
| महिला | 2 | 33 | 5 | 3 | 5 | 0 | 0 | 57 | 0 | 0 | 105 |
| खेळाडु | 0 | 6 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 10 | 0 | 0 | 18 |
| प्रकल्पग्रस्त | 0 | 6 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 10 | 0 | 0 | 18 |
| भुकंपग्रस्त | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 4 | 0 | 0 | 6 |
| माजी सैनिक | 1 | 17 | 3 | 1 | 3 | 0 | 0 | 29 | 0 | 0 | 54 |
| अशंकालीन पदवीधर | 0 | 6 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 10 | 0 | 0 | 18 |
| पोलीस पाल्य | 0 | 3 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 11 |
| गृहरक्षक दल | 0 | 6 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 10 | 0 | 0 | 18 |
| अनाथ | महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक अनाथ--2018/प्र.क. 182/का–03, दिनांक 23.08.2021 नुसार एकुण रिक्त पदांच्या 1 % इतकी पदे. | | | | | | | | | | |
| **एकुण** | **5** | **110** | **17** | **9** | **17** | **0** | **0** | **190** | **0** | **0** | **348** |

**<u>महत्वाची टिप –</u>**

जिल्हा पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कुणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाची मागणी केल्यास संबधीत उमेदवारांने त्याबाबतची माहिती ॲन्टीकरॅपशन ब्युरो, गडचिरोली यांना दुरध्वनी क्रमांक 07132–222987 वर त्वरील संपर्क साधुन तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार पोलीस अधीक्षक, गडचिरोली या कार्यालयातील वरिष्ठ अधिका–यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस भरती समिती– 2021 तथा पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांच्याशी संपर्क साधुन तक्रार करू शकतील. तसेच, पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुबंई यांच्या कार्यालयात 022–22855614 या दुरध्वनी क्रमांकावरही तक्रार करता येईल.

उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | दुरध्वनी /मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| 1 | समाधान कक्ष, पोलीस अधीक्षक कार्यालय, गडचिरोली | 8806312100 (कार्यालयीन वेळेत) |

( नीलोत्पल, भापोसे )
पोलीस अधीक्षक, गडचिरोली